# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(40 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(४० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

**[गुण : ४०]**

या तरतुदीप्रमाणे सहकारी संस्थेला होणाऱ्या नफ्याचा भाग या कामगारांमध्ये वाटण्याची तरतूद करण्यात यावी असे माझे म्हणणे आहे. एखाद्या सहकारी संस्थेत असे कामगार नसले तर गोष्ट निराळी. परंतु कामगार नाहीत अशी सहकारी संस्था सापडणे शक्य नाही. ज्या सहकारी संस्थांना शक्य असेल त्यांनी आपल्या संस्थेतील कामगारांना भविष्य निर्वाह निधी द्यावा अशी तरतूद केली तर या शक्यतेचे रुपांतर अशक्यते-मध्ये होईल. आणि त्यामुळे कोणत्याही सहकारी संस्थेत अशा फंडाची व्यवस्था होणार नाही. या सहकारी चळवळीमध्ये भांडवलशाही शिरणार नाही याची काळजी आपण घेतली पाहिजे. सहकारी साखर कारखान्यांचा जो अनुभव आहे त्यावरुन तरी तेथे भांडवलशाहीचा वास मोठ्या प्रमाणात येतो. सहकारी चळवळीमध्ये असे होता काम नये. अशा सहकारी संस्थांच्या सभासदांना वाढीव नफा द्यावयाचा असेल तर विरोध करण्याचे कारण नाही. कारण सहकारी संस्थांना मिळणारा फायदा एकटयाला मिळत नाही. तर तो सर्व सभासदांना मिळतो. पुष्कळ वेळा गरीब लोकसुद्धा या सहकारी संस्थांचे सभासद असतात. म्हणून सहकारी चळवळ ही गरीबांची चळवळ आहे असे म्हटले जाते. त्यामुळे त्यांना अशा वाढीव दरानेच नफा दिला गेला पाहिजे.

पण हे सर्व करीत असतांना त्यामध्ये काम करणारे जे लोक आहेत त्यांना, ज्यांच्या धामावर हा पैसा उभा राहतो त्यांना कल्याणप्रद ठरणाऱ्या काही योजना आपण राबविणे आवश्यक आहे असे माझे आग्रही म्हणणे आहे.